# २८. लघवी बंद होणे – कमी होणे : कारणे

(मूत्र संस्थेचे आजार)

| अनु. क्र. | कारणांचा गट | आजारांची उदाहरणे | विशेष बाबी |
| --- | --- | --- | --- |
| १. | **शरीरातील रक्त किंवा पाणी कमी होऊन, मूत्र तयार करण्याचे काम थंडावणे** | जुलाब–उलट्यांनी येणारी शुष्कता, उष्माघात, अपघातातील रक्तस्त्राव | शुष्कतेची अथवा अतिरक्तस्त्रावाची वस्तुस्थिती माहीत असते. |
| २. | **दोन्ही मूत्रपिंडांना सूज येणे अथवा दोन्ही मूत्रपिंडांचे इतर आजार.** | निरनिराळ्या प्रकारचे जंतुदोष व त्यामुळे येणारे वावडे व दाह. | लघवीत प्रथिने, कधीकधी रक्त आढळते. |
| ३. | **दोन्ही बाजूच्या मूत्रपिंडांतून येणाऱ्या मूत्रमार्गात अडथळा येणे** | दोन्ही बाजूंच्या मूत्रवाहिन्यांत खडे होणे, मूत्राशय किंवा मूत्रनलिका यांत अडथळा तयार होणे, कर्करोग इ. | क्ष–किरण व इतर प्रकारची खास तपासणी आवश्यक. |